# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार**

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९४५१००१

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक - १५२-२२** **दिनांक :- २७/०५/२०२२**

## ११५ ग्रॅम वजनाचा एम.डी.(मॅफेड्रॉन) अंमली पदार्थ बाळगणा-या २ परकीय नायझेरियन ईसमांवर कारवाई

दिनांक २७/०५/२०२२ रोजी, अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे अंमलदार यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, नालासोपारा (पुर्व), सेंट्रल पार्क पेट्रोल पंप परिसरात परकीय नायझेरियन नागरीक ईसम मॅफेड्रॉन हे अंमली पदार्थ विक्रीकरीता येणार आहे.

सदर मिळालेल्या बातमीप्रमाणे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे अधिकारी/अंमलदार यांनी सेंट्रल पार्क पेट्रोलपंप परिसरात सापळा रचुन कारवाई केली असता परकीय नायझेरियन नागरिक इसम ऑस्टीन ओमाका वय ४५ वर्षे, रा. ९० फिट रोड, प्रगती नगर, नालासोपारा (पुर्व), मुळ रा.लागोस, देश-नायजेरिया याने स्वत:चे कब्ज्यात ६० ग्रॅम वजनाचा ६,००,०००/-रु. किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असताना मिळुन आला. तसेच त्याचा साथीदार २) जोसेफ ईमान्युल वय ३६ वर्षे, रा ९० फिट रोड, प्रगती नगर, नालासोपारा (पुर्व), मुळ रा. लागोस, देश-नायजेरिया याने स्वत:चे कब्ज्यात ५५ ग्रॅम वजनाचा ५,५०,०००/-रु. किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असताना मिळुन आला असुन संपुर्ण कारवाई दरम्यान त्यांचेकडुन एकुण ११५ ग्रॅम वजनाचा ११,५०,०००/-रु. किंमतीचा मॅफेड्रॉन अंमली पदार्थ जप्त करण्यात असुन नमुद इसमांविरुध्द अंमली पदार्थ कायदा कलम ८ (क), २१ (क),२९ प्रमाणे तुळींज पोलीस ठाण्यात ।। ३२४/२०२२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास तुळींज पोलीस ठाण्याकडुन चालु आहे.

वरील कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोनि/ देवीदास हंडोरे, सपोनि/विलास कुटे, मसपोनि/तेजश्री शिंदे, नेमणुक-भरोसा सेल पो.हवा/ धनाजी इंगळे, पवन पाटील, प्रदिप टक्के, सुभाष आव्हाड, विष्णुदेव घरबुडे यांनी केली आहे.